सकाळ



तव (ता. मुळशी) : परिसरात भारतीय व स्थानिक प्रजातींची झाडे लावण्याच्या उपक्रमात सहभागी झालेले विश्वकर्मा विद्यापीठाचे विद्यार्थी व शिक्षक.

# स्थानिक प्रजाती रोपांची तव परिसरात लागवड

पिरंगुट, ता. ७ : पुणे येथील विश्वकर्मा विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी तव (ता. मुळशी) येथील परिसरात भारतीय व स्थानिक प्रजातींची झाडे लावली. करंज, पिंपळ, वड आदी वृक्षांचा त्यात समावेश आहे. यावेळी तव ग्रामपंचायतीचे सदस्य, ग्रामस्थ तसेच विश्वकर्मा विद्यापीठातील विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांना परिसरातील विविध देशी औषधी वनस्पतींची माहिती दिली. हिरडा, बेहडा, अडुळसा, आवळा आदी वनस्पतींची ओळख करून दिली. विश्वकर्मा विद्यापीठातील निसर्ग व पर्यावरण विभागाचे प्राध्यापक अमोल कांबळे ,डॉ. विद्या नागरे व विद्यार्थ्यांच्या सहभागाने पार पडला. तव ग्रामस्थांनी झाडांचे संगोपन करण्याची ग्वाही दिली.

Pune, District-Today
08/09/2024 Page No. 6